महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५५६६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

==========================================================================

जा.क्र.तशिविकापू/विवि/मेरीट-कम-मिन्स/२०२०/3632 दिनांक :- 26 OCT 2020

प्रति,
संचालक/ प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त व्यावसायीक अभ्यासक्रम राबिवणा-या संस्था,
पुणे विभाग, पुणे

विषय :- सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजनेच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ :- १. मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र १८/ तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/२०५ दि ०४/०९/२०२०

२. मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र १८/ तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३२४दि २९/०९/२०२०

३. मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र १८/ तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३३९ दि २०/१०/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त व्यावसायीक अभ्यासक्रम राबिवणा-या सर्व संस्था यांना कळविण्यात येते की, अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांची केद्रशासन पुरस्कत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजनेच्या सन २०२०-२१ च्या अंमलबजावणीबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास सूचित केलेले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या ज्या संस्थांनी मागील वर्षी (National Scholarship Portal (NSP ) भरुन मंजूरी घेतलेली नाही अशा संस्थांनी संस्था रजिस्ट्रेशन अर्ज (Institute KYC) भरुन मंजूर करुन घ्यावे अशी सूचना देण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी केद्रशासन पुरस्कत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजनेचे अर्ज भरण्याची मुदत दि ३१/१०/२०२० व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्याचे ऑनलाईन अर्ज तपासणी करण्याची अंतिम मदत दिनांक १५/११/२०२० आहे.

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त व्यावसायीक अभ्यासक्रम राबिवणा-या संस्थानी अद्याप संस्था नोंदणी अर्ज National Scholarship Portal –KYC भरुन या कार्यालयाकडून मंजूर करुन घेणे बाकी आहे अशा संस्थांनी (Institute Registration Form-KYC) भरुन मंजूर घ्यावी, ज्या संस्थांच्या लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज तपासणीसाठी प्रलंबित आहेत त्यांनी त्वरीत तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन अंतिम दिनांकापूर्वी निकाली काढाव्यात. विद्यार्थ्यांचे अर्ज मुदतीनंतर तपासणीसाठी प्रलंबित राहिल्यास व पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासुन वंचित राहिल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील यांची नोंद घ्यावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

सोबत :- संदर्भिय पत्र